# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** नवी मुंबई **P.S.(ठाणे):** रबाळे **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0164 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/03/2022 05:21 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 30/03/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 31/03/2022
**Time From (वेळेपासून):** 18:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 05:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/03/2022 **Time (वेळ):** 05:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 006 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/03/2022 05:08 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 4 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** अतिरीक्त कार्यकारी अभियंता, महावितरण ,ऐरोली राब विभाग,सेक्टर 15, ऐरोली

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्रध्दा लक्ष्मण कांबळे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 202, सी विंग, जानकी अपार्टमेंट,प्लॉट नं 164, सेक्टर 2, उळवे,नवी मुंबई, जिल्हा रायगड, एन.आर.आय सागरी,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 202, सी विंग, जानकी अपार्टमेंट,प्लॉट नं 164, सेक्टर 2, उळवे,नवी मुंबई, जिल्हा रायगड, एन.आर.आय सागरी,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9004617934

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती वर्षा प्रभाकर देशमुख | | | 1. राकेश पार्क, प्लॉट नंबर 6,रो हाऊस, सेक्टर 8 ऐरोली,रबाळे ,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 50 हजार रुपये | 50,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 50,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 31/03/2022 मी श्रध्दा लक्ष्मण कांबळे, वय 24 वर्षे, व्यवसाय:- नोकरी, राहणार - 202, सी विंग, जानकी अपार्टमेंट, प्लॉट नं 164, सेक्टर 2, उळवे, नवी मुंबई, जिल्हा रायगड, मोबाईल नंबर 9004617934 अशी असुन फिर्याद देते की,मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबासमवेत राहत आहे. मी सध्या सिध्दार्थ कॉलेज, फोर्ट, मुंबई येथे आर्टस या विषयाच्या तृतीय वर्शात शिकत आहे. तसेच मी ओम इलेक्ट्रीकल्स, कार्यालयीन पत्ता - 202, प्लॉट नंबर 11, गोल्ड सिटी, सेक्टर 19 डी, वाशी, नवी मुंबई - 400703 येथे बिलींग सुपरवायझर म्हणून मागील दीड वर्शांपासून काम करीत आहे. ओम इलेक्ट्रीकल्स या भागिदारी फर्म संस्थेमध्ये श्री. धर्मराज देशपांडे, श्री.दिपक बोराटे, श्री.महेष इंगसे असे भागिदार आहेत. ओम इलेक्ट्रीकल्स भागिदार फर्मचे वतिने इलेक्ट्रीकल कामाबाबत कॉन्ट्रक्टर म्हणून लायसन्स आहे. मी काम करीत असलेल्या नमुद भागिदारी फर्म ही महावितरण (एम.एस.ई.डी.सी.एल कंपनी) ची लोड वाढविणे, ब्रेक डाउन मेन्टनन्स इ. कामे घेतली जातात. सदरच्या कामांचे लायझनिंगचे काम सुध्दा मी पाहते. मी काम करीत असलेल्या ओम इलेक्ट्रीकल्सने सध्या नारायण डेरी, प्लॉट नं. डब्लु 413, एमआयडीसी रबाळे, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, टी.बी. रोड, नवी मुंबई - 400701 यांचे इलेक्ट्रकल कनेक्षन मध्ये अतिरिक्त लोड वाढविण्याचे काम घेतले आहे. याबाबत नारायण डेरी यांनी आमचे नमुद फर्मला अॅथोरटी पत्र दिले आहे. तसेच सदरचे कामाची फाईल त्यामध्ये नारायण डेरीचा अर्ज व संबंधित कागदपत्रे तसेच फेजेबिल्टी अहवाल हा सहा.अभियंता, शाखा कार्यालय, महावितरण, रबाळे नवी मुंबई असे कागदपत्रे आम्ही दिनांक 16/03/2022 रोजी अतिरीक्त कार्यकारी अभियंता, ऐरोली उप विभाग यांचे कार्यालयामध्ये सादर केली आहे. सदरची फाईल सध्या अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्रीमती देशमुख, ऐरोली उप विभाग यांचे कार्यालयामध्ये प्रलंबित आहे. सदरची फाईल त्यांनी पिफारस केल्यानंतर पुढे मंजूरीसाठी कार्यकारी अभियंता, वाषी येथे पाठवितात अषी कार्यप्रध्दत आहे. दिनांक 22/03/2022 रोजी मी नमुद कामाचे संदर्भात विचारणा करण्याकरीता श्रीमती देषमुख, अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांना त्यांचे कार्यालयामध्ये जावून भेटली असता, त्यांनी मला दिनांक 23/03/2022 रोजी येण्यास सांगून, 23 तारखेलाच आपण साईट व्हिजीट करू असे सांगितले. सदर कार्यालयामधून निघताना, मी त्यांना विचारुन त्यांचा मोबाईल नंबर 9167433324 माझेकडे नोंदवून घेतला होता. त्यानंतर मी दिनांक 23/03/2022 रोजी माझे मोबाईल फोन नं. 9004617934 यावरुन श्रीमती देषमुख यांना त्यांचे नमुद मोबाईल फोनवर फोन केला असता, त्यांनी मला 24/03/2022 रोजी कार्यालयामध्ये येण्यास सांगितले.तद्नंतर दिनांक 24/03/2022 रोजी मी पुन्हा श्रीमती देशमुख यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 9167433324 वर संपर्क साधून विचारणा केली असता, त्यांनी मला दुपारी 3 ते 4 चे सुमारास कार्यालयामध्ये येण्याविशयी सांगितले. त्यानुसार मी दुपारी 4 वाजता श्रीमती देशमुख यांचे कार्यालयमध्ये गेले होते. त्यानंतर मी व

श्रीमती देशमुख असे आम्ही दोघे साईट विजीट करण्याकरीता नारायण डेरी, प्लॉट नं. डब्लु 413, एमआयडीसी रबाळे, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, टी.बी. रोड, नवी मुंबई - 400701 येथे गेलो. श्रीमती देशमुख यांनी साईट व्हिजीट केल्यानंतर, त्यांनी मला हया कामाकरीता ऑफीस मधून किती पैसे मिळणार असे विचारले, त्यावर मी त्यांना म्हणजे काय असे विचारले असता, त्यांनी मला सांगितले की, त्या ही फाईल त्या सक्षन करणार आहेत, तर त्यांना प्रोसेसिंग फी म्हणून पैसे लागतील. त्यावर मी त्यांना प्रोसेसिंग फीची रिसीट मिळणार का असे विचारले त्यावर त्यांनी मला सांगितले की, सदरची प्रोसेसिंग फी ही इनलिगल आहे, त्यावर मी त्यांना किती पैसे लागतील असे विचारले त्यावर त्यांनी 50,000 /- रूपये लागतील असे सांगून, तू तुझे ऑफीसमध्ये माझे नाव सांगू नकोस, त्यावर मी त्यांना मला थोडा वेळ दया असे सांगून मी तेथून निघून आले.यावरून माझी स्पष्ट खात्री झाली आहे की, अतिरीक्त कार्यकारी अभियंता श्रीमती देषमुख , ऐरोली उप विभाग यांना त्यांनी मागितलेले 50,000 /- रूपये दिल्या खेरीज त्यांचेकडेस असलेल्या नारायण डेरीचे कामाची फाईल शिफारस करुन मंजूरीकरीता पुढे पाठविणार नाहीत. मला त्यांना 50,000 रूपये देण्याची अजिबात इच्छा नाही. तसेच श्रीमती देशमुख यांचेसोबत माझा कोणताही आर्थिक व्यवहार नसून माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे वैर नाही. यासोबत मी नारायण डेरीचा अर्ज, मला ओम इलेक्ट्रीकल्सकडून मला मिळालेले प्राधिकार पत्र व संबंधित कागदपत्रांची छायांकित प्रत जोडत आहे. तरी श्रीमती देशमुख, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, ऐरोली उप विभाग, नवी मुंबई यांचेविरूध्द भ्रष्ट्रचार प्रतिबंधक कायदयाअन्वये कायदेषीर कारवाई होण्यासाठी मी दिनांक 25/03/22 रोजी मी अँन्टी करप्षन ब्युरो ठाणे येथे जावुन पोलीस उप अधीक्षक श्रीमती माया एच.मोर यांचेकडेस लेखी अर्ज सादर केला. त्यावेळेस पोलीस उप अधीक्षक/श्रीमती माया एच.मोरे यांनी दोन षासकिय पंचाना बोलवुन मी दिलेली तक्रार वाचण्यास देवुन त्यावर पंचानी व पोलीस उप अधीक्षक/श्रीमती माया एच.मोरे यांनी सहया केल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक/श्रीमती माया एच.मोरे यांनी पंचाच्या उपस्थित सर्व कायदेषीर बाबींचा अवलंब करुन पंच 1 श्रीमती मनाली भोई यांचेसह माझेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी मला लोकसेविका देषमुख यांचे ऐरोली उपविभाग, महावितरण कार्यालय, नवी मुंबई येथे जाण्यास सांगितले. त्यावेळी मी, पंच श्रीमती मनाली भोई असे खाजगी वाहनातुन उतरुन कार्यालयाच्या दिशेने स्कुटरने रवाना झालो. तिथे गेल्यावर श्रीमती देषमुख यांचे केबिन मध्ये गेलो त्यावेळी मी त्यांना कसे करायचे, कोटेषन किती होणार असे विचारले त्यावर त्यांनी कोटेशन त्यांचे कार्यालयातील भक्त मडम तयार केले नसल्याचे सांगितले व उदया 11 ते 11.30 वाजता ऑफीसमध्ये ये ती पण मग कोटेशन सांगेन मग तुला नक्की समजेल अशा म्हणाल्या. त्याप्रमाणे आम्ही पुन्हा सापळा पथकाकडे येवुन पोलीस उप अधीक्षक श्रीमती माया मोरे मडम यांना सर्व हकीगत सांगितली. त्याप्रमाणे पोलीस उप अधीक्षक श्रीमती माया मोरे मडम यांनी मला तसेच पंचाना तसेच पडताळणी पथकातील कर्मचारी यांना गोपनिय बाळगण्याच्या सुचना देवुन मला दिनांक 26/03/2022 रोजी सकाळी 10.30 वा. ऐरोली सेक्टर 17 येथे हजर राहण्याबाबतच्या सुचना दिल्या.त्याप्रमाणे मी दिनांक 26/03/2022 रोजी युरो षाळेच्या मागे बसे पार्कीगमध्ये ऐरोली नवी मुंबई येथे आली सदर ठिकाणी सापळा पथक व पंच हजर झाले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती माया मोरे मडम यांनी पुन्हा एकदा लाचेच्या मागणीची पडताळणी करणार आहोत असे सांगुन पंचाच्या उपस्थित सर्व कायदेषीर बाबींचा अवलंब करुन पंच 1 श्रीमती मनाली भोई यांचेसह माझेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी मला लोकसेविका देशमुख यांचे ऐरोली उपविभाग, महावितरण कार्यालय, नवी मुंबई येथे जाण्यास सांगितले त्याप्रमाणे मी व पंच क्रमांक 1 मनाली भोई असे सरकारी वाहनातुन उतरुन स्कुटरवरुन लोकसेविका देषमुख यांचे ऐरोली उपविभाग, महावितरण कार्यालय, नवी मुंबई पोहचलो. त्यावेळी तेथील गेटवरील वॉचमन ने मला सांगितले की, श्रीमती देशमुख हया कार्यालया मध्ये नाही आहेत. म्हणुन मी माझे मोबाईल क्रमांक 9004617934 वरुन देशमुख मडम यांचा मोबाईल क्रमांक 9167433324 वर फोन करुन माझे मोबाईलचा स्पिकर ऑन केला त्यावेळी देषमुख मडमनी फोन उचलला नाही परंतु थोडया वेळाने देषमुख मडमने माझे मोबाईलवर फोन करुन सांगितले की, मी एक दिड तासा मध्ये येणार आहे. असे त्यांनी सांगितल्यांनी मी व पंच क्रमांक 1 पुन्हा सापळा पथकाजवळ आलो व सर्व घडलेली हकीगत पोलीस उप अधीक्षक श्रीमती माया मोरे मडम यांना सांगितली. त्यावेळी लोकसेविका हया एकदिड तासाने त्यांच्या कार्यालयात येणारे असल्याने पोलीस उप अधीक्षक श्रीमती मोरे मडम यांनी थोडा वेळ थांबण्याच्या सुचना दिल्या.थोडया वेळ झाल्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती माया मोरे मडम यांनी पुन्हा सर्व कायदेषीर बाबींचा अंवलंब करुन मला व पंच क्रमांक 1 मनाली भोई यांना माझेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी मला लोकसेविका देशमुख यांचे ऐरोली उपविभाग, महावितरण कार्यालय, नवी मुंबई येथे जाण्यास सांगितले. मी, लोकसेविका देशमुख यांच्या कार्यालयात पोहचले असता तिथे देशमुख मडम नसल्याने त्यांना फोन लावला असता त्यांनी फोन उचलला नाही म्हणुन मी पुन्हा एकदा त्यांना फोन लावला असता त्यांनी मला सांगितले की, त्या साईटवर बाहेर आहेत तुला थांबायचे आहे असल्यास थांब असे सांगितले. त्यावेळी लोकसेविका देषमुख हया कार्यालयात येणार नसल्याचे माझी खात्री झाली म्हणुन मी पुन्हा षासकीय वाहनाजवळ आले व सर्व घडलेली हकीगत पोलीस उप अधीक्षक श्रीमती माया मोरे मडम यांना सांगितले तसेच मी त्यांना सांगितले की, ज्यावेळी लोकसेविका देशमुख हया त्यांच्याकडे लोचेची मागणी बाबत संर्पक करतील त्यावेळी मी अँन्टी करप्षन ब्युरोचे कार्यालयात येणार आहे. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्रीमती माया मोरे मडम यांनी मला तसेच पंच व सापळा पथक यांना सांगितले की, श्रीमती देशमुख ज्या वेळी मला पुन्हा संर्पक करतील त्यावेळेसे आपण पुन्हा लाचेच्या मागणीची पडताळणी करणार आहोत. त्यानंतर मला दिनांक 30/03/2022 रोजी सकाळी माझे मोबाईलवर लोकसेविका देषमुख मडम यांचा मिसकॉल पडल्याचे दिसले त्यामुळे मी लागलीच अँन्टी करप्षन ब्युरो, ठाणे येथे येवुन पोलीस उप अधीक्षक श्रीमती माया मोरे मडम यांना सदरची बाब सांगितली. त्याप्रमाणे लागलीच सापळा पथक व सरकारी पंच पोलीस उप अधीक्षक मोरे मडम यांचे कार्यालयात हजर झाले त्यांनी मला व पंचाना सांगितले की, मी, लोकसेविका देशमुख यांना प्रथम फोन करुन कामाची बोलणी करने त्यावेळी सदरचा कॉल हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत होणार आहे. त्याप्रमाणे त्यांनी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन मपोशि/ठोंबरे यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करण्यास सांगितला त्याप्रमाणे मी लोकसेविका देशमुख यांना फोन कॉल केला असता त्यांनी सांगितले की, त्या मडम पण आलेल्या नव्हत्या तुझे फाईलपण मी सन्षन विचारले होते. थोडयावेळाने फोन करणार. असे म्हणाल्या. त्याप्रमाणे मी सांगितले की, लोकसेविका देशमुख हया थोडयावेळाने मला फोन करणार आहे. त्याप्रमाणे पोलीस उप अधीक्षक श्रीमती मोरे मडम यांनी आपण लाचेची मागणीची पडताळणी करण्याकरिता ऐरोली येथे जाणार असल्याचे सांगितले त्याप्रमाणे सर्व सापळा पथक, पंच व मी असे सरकारी वाहन तसेच मी आणलेली ज्युपिटर वाहनाने अँन्टी करप्षन ब्युरो, कार्यालयातुन निघुन ऐरोली येथे अभुदय बक ऐरोली शाखेच्या समोरील रोडवर पोहचलो. त्यांनतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती मोरे मडम यांचे सुचनानुसारे मपोशि ठोबरे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु केला व मी लोकसेविका देशमुख यांना फोन लावला. परंतु लोकसेविका यांचा फोन कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर आहे असे सांगत असल्याने मला पुन्हा एकदा फोन लावण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी पुन्हा एकदा लोकसेविका देशमुख यांना फोन केला असता त्यांचा फोन नेटवर्क क्षेत्राच्या बाहेर आहे असे सांगत होता. त्यामुळे थोडा वेळ पुन्हा थांबुन पोलीस उप अधीक्षक श्रीमती मोरे मडम यांच्या सुचनेनुसार मी लोकसेविका कांबळे यांना फोन केला असता सदरचा फोन लागला त्यावेळी त्या म्हणाल्या की, कोटेषनचे 90 हजार झाले आहेत, बाकीचे काही आहे ते तु बघुन घे कसे करायचे 4 वाजता ये असे म्हणाल्या. फिर्याद दिनांक 31/03/2022

त्यांनतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती मोरे मॅडम यांनी मला व पंच क्रमांक 1 मनाली भोई यांना लाचेच्या मागणीची पडताळणी करणेकामी

लोकसेविका यांचे कार्यालयात पाठविणार असल्याचे सांगितले त्याप्रमाणे त्यांनी सर्व कायदेशीर बाबींचा अवंबल करुन मला व पंच क्रमांक 1 मनाली भोई यांना माझेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवुन लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी मला लोकसेविका देषमुख यांचे ऐरोली उपविभाग, महावितरण कार्यालय, नवी मुबंई येथे जाण्यास सांगितले. मी व पंच क्रमांक 1 मनाली भोई असे लोकसेविका देशमुख यांच्या कार्यालयात पोहचले त्या वेळी लोकसेविका देशमुख ह्या त्यांच्या कार्यालया मध्ये नव्हत्या. म्हणुन मी त्यांना फोन केला असता त्यांनी फोन घेतला नाही म्हणुन मी पुन्हा त्यांना फोन केला असता त्यांनी मला सांगितले की, त्या त्यांचे कार्यालयात येणार आहे म्हणुन मी व पंच मनाली भोई असे लोकेसेविका देशमुख यांचे केबिनच्या बाहेर उभ्या राहिलो. थोडयावेळयाने लोकसेविका देशमुख या त्यांच्या कार्यालया मध्ये आल्या व मला आत मध्ये बोलावुन घेतले त्यावेळी मी व पंच क्रमांक 1 भोई असे त्यांच्या कॅबिन मध्ये गेलो. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, '' कोटेशन बनवले आहे त्याचे 90 हजार होतील माझेकडुन डिव्हीजनकडे जाते त्यावर मी त्यांना कसे करायचे तुम्ही सांगा असे सांगितले असता, त्यांनी वरचे जे काही आहे ते तुम्हा कॉन्ट्रक्टराना माहित असते. वाशी डिव्हीजनसचे पर्सनली जावुन करावे लागले, तरी 50 हजार एक्स्ट्रा खर्च पकडुन चल, त्यावर मी त्यांना विचारले की, 50 हजार एक्स्ट्रा खर्चाची रिसीप्ट मिळेल का , त्यावर त्यांनी मला 90ची रिसीप्ट मिळेल बाकीचे अँन ऑफिषियल आहेत. त्यावर मी लोकसेविका देशमुख यांना म्हणाले की, मग तुम्ही बोलल्याप्रमाणे 50 कधी घेवुन येवु त्यावर त्यांनी उदया परवा घेवुन ये असे सांगितले त्यावेळी मी त्यांना म्हणाले की, मला गावी जायाचे डोक्यात आहे. आता करुन टाका ना त्यावर त्या म्हणाल्या काही प्राब्लेम नाही तु आणुन दिले तर म्हणुन मी त्यांना म्हणाले की, मी अर्धा एक तासात सरांशी बोलुन येते त्यावर त्या ये असे म्हणुन कमी जास्त आहे ते मी सांगते असे म्हणाल्या. म्हणुन मी त्यांना अर्धा तासात येते लवकर असे सांगुन तेथुन निघुन सापळा पथक उभे असलेल्या ठिकाणी आले व सर्व घडलेली हकीगत पोलीस उप अधीक्षक श्रीमती मोरे मॅडम यांना सांगितली.

पोलीस उप अधीक्षक श्रीमत मोरे मॅडम यांनी मी सांगितलेली हकीगत तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण हे बरोबर असल्याची खात्री केली तसेच लोकसेविका देषमुख या लाचेच्या पैशाची मागणी करत असल्याचे निशपन्न झाल्याने पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविले त्याप्रमाणे पोलीस उप अधीक्षक श्रीमती माया एच.मोरे यांनी लोकसेविका देशमुख यांचे मागणीप्रमाणे त्यांना देण्यासाठी पैसे उपलब्ध आहेत का ? याबाबत विचारणा केली. त्याप्रमाणे मी 50 हजार रुपये सापळा पथका समोर हजर केले. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक/श्रीमती माया एच.मोरे यांनी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन मी हजर केलेल्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावुन सापळा पुर्व कारवाई करुन मला लोकसेविका देषमुख यांना त्यांचे मागणीप्रमाणे लाचेच्या देण्याकरिता लोकसेविका देशमुख यांचे कार्यालय ऐरोली उपविभाग, महावितरण कार्यालय, नवी मुबंई येथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्रं.1 श्रीमती मनाली भोई यांचेसह पुन्हा पाठविले.

सापळा कारवाई दरम्यान मी व पंच नंबर 1 भोई यांचे सोबत श्रीमती देशमुख यांचे केबिन मध्ये गेले त्यावेळी श्रीमती देशमुख यांनी पंच नंबर 1 भोई यांचे समक्ष लाचेची रक्कम रुपये 50 हजार स्विकाली. त्यानंतर मी सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याबाबत पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावरून दिनांक 30/03/2022 रोजी 18.05 वा.लोकेसविका देशमुख अतिरीक्त कार्यकारी अभिंयता, महावितरण ऐरोली उप विभाग यांना सापळा पथकाने रंगेहात पकडले. त्याचवेळी लोकसेविका देशमुख यांचे केबिनची झडती घेतली असता, लाचेची रक्कम लोकसेविका बसलेल्या टेबल्याच्या दुस-या ड्राव्र्हरमध्ये ठेवले असल्याचे मिळुन आली. त्यावेळी सदर नोंटाचे क्रमांक पडताळुन पाहिले असता ते सापळापुर्व कारवाईदरम्यान नोंदविलेल्या क्रमांकाशी जुळुन आले. अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात केलेल्या तपासणीमध्ये हस्तगत केलेल्या लाचेच्या नोंटावर व लाचेची रक्कम स्विकारणाऱ्या लोकसेविका अतिरीक्त कार्यकारी अभिंयता, महावितरण ऐरोली उप विभाग यांचे उजवे हातावर अँथ्रसिन पावडर चकाकताना दिसुन आली.

तरी लोकसेविका वर्षा प्रभाकर देशमुख अतिरीक्त कार्यकारी अभियंता, महावितरण ,ऐरोली सब विभाग, सेक्टर 15, ऐरोली रा.राकेश पार्क, प्लॉट नंबर 6, रो हाऊस, सेक्टर 8 ऐरोली यांनी त्यांना लोकसेवकच या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग नारायण डेरी प्लॉट नंबर डब्लु 413 टीटीसी इंडस्ट्रीयल टी.बी रोड नवी मुबंई येथील इलेक्ट्राल कनेक्षन मध्ये अतिरीक्त लोड वाढविण्याच्या कामाची शिफारस करुन ती फाईल अभियंता वाशी यांचे कार्यालयात मंजुरीसाठी पाठविणेकरिता 50 हजार रुपयाची लाचेची मागणी करुन ते स्विकारले म्हणुन माझी लोकसेविका वर्षा प्रभाकर देशमुख यांचे विरूध्द कायदेषिर तक्रार आहे.
समक्ष

( माया एच.मोरे )
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,ठाणे

फिर्याद लिहुन दिली,

( श्रध्दा लक्ष्मण कांबळे )

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): DULBA DADARAO DHAKNE(I (Inspector)) / POBN70659 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): DULBA DADARAO DHAKNE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN70659

पोलीस ठाणे अंमलदार
रबाळे पोलीस ठाणे
नवी मुंबई